**<u>संक्षिप्त फौजदारी खटला क्र.७१४/२०२२ – निशाणी ४४ लगत आदेश</u>**

अर्जुन बाबर वि. प्रविण चौगुले

CNR NO. MHSO20-002601-2022

प्रस्तुतचा खटला फिर्यादी यांनी आरोपीविरुध्द निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट ॲक्ट कलम १३८ व इंडियन पिनल कोड कलम ४२० प्रमाणे दाखल केला आहे. आरोपीने प्रस्तुतचा अर्ज बचावाचा साक्षीदार म्हणून "श्री. प्रताप शामराव येलपले, रा. अजनाळे, ता. सांगोला, जि. सोलापूर" यांना याकामी साक्षीदार म्हणून साक्षीसमन्स काढणेची व अर्ज मंजूर करणेची विनंती केली.

२. फिर्यादी तर्फे प्रस्तुत अर्जास असे म्हणणे मांडले की, आरोपी मुद्दाम वेळकाढुपणा करत आहे. आरोपीने स्वतः साक्षीदारास हजर करणे आवश्यक आहे. सबब, अर्ज नामंजूर करणेची विनंती केली.

३. प्रस्तुतचा खटला निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट ॲक्ट कलम १३८ व इंडियन पिनल कोड कलम ४२० प्रमाणे दाखल केला आहे. प्रस्तुत अर्जामध्ये आरोपीतर्फे पुरावा देण्यात आला आहे. आरोपीस बचावाकरीता "श्री. प्रताप शामराव येलपले, रा. अजनाळे, ता. सांगोला, जि. सोलापूर" यांची साक्ष घ्यायची आहे. प्रस्तुत अर्जाद्वारे आरोपीने "श्री. प्रताप शामराव येलपले, रा. अजनाळे, ता. सांगोला, जि. सोलापूर" यांना साक्ष घेण्यासाठी साक्षीसमन्स काढण्याची विनंती केली आहे. प्रकरणाचे एकंदरीत अवलोकन करता गुणदोषांवर अर्जाची निर्गती होण्यासाठी आरोपीस संधी देणे उचित वाटते. फिर्यादीतर्फे सदर साक्षीदाराची साक्ष निरर्थक आहे असे कथन नाही. सबब, सदर साक्षीदाराची साक्ष साक्षीसमन्स काढून नोंदवल्याने फिर्यादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. तसेच फिर्यादीला साक्षीदाराच्या उलटतपासाची संधी आहे. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

**<u>आ दे श</u>**

१. आरोपीचा अर्ज (नि.क्र.४४) मंजूर करणेत येतो.

२. आरोपीला "श्री. प्रताप शामराव येलपले, रा. अजनाळे, ता. सांगोला, जि. सोलापूर" यांना साक्षी समन्स काढून साक्ष नोंदवण्याची मुभा राहील.

३. आरोपीने आवश्यक खर्चाची पूर्तता करावी.

PRACHI RAVINDRA KULKARNI
Digitally signed by PRACHI RAVINDRA KULKARNI
Date: 2026.04.17 18:01:32 +0530

दिनांक – १७/०४/२०२६

(श्रीमती पी. आर. कुलकर्णी)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर, सांगोला.

# C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of Stenographer | : | Shri. S. S. Patne |
| (b) | Court | : | Smt. P. R. Kulkarni,<br>Civil Judge, J.D. &<br>J.M.F.C. Sangola |
| (c) | Judgment /Order signed by P.O. on | : | 17/04/2026 |
| (d) | Judgment /Order digitally signed by P.O. on | : | 17/04/2026 |
| (e) | Judgment /Order uploaded on | : | 17/04/2026 |